# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी मुंबई

दिनांक : १६/ ०५ /२०१७

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय : मंगळवार दि. १३ जून, २०१७ रोजी अंगारकी संकष्टी चतुर्थी दिवशी सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून भाविकांच्या रांग व्यवस्थेवर निगराणी ठेवण्याकरीता भाडेतत्त्वावर सीसीटिव्ही यंत्रणा बसवून त्यांचे मॉनिटरींग करणे. (सोमवार मध्यरात्र ते मंगळवार रांगसंपेपर्यत)**

वरील विषयातील नमूद कामे करण्यासाठी तसेच सामुग्री पुरवठा करण्यासाठी पुरवठादार/उत्पादकांकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. कामाच्या व्याप्तीची (Scope of work) माहिती अ.क्र. ६ ते ७ येथे नमूद करण्यात आली आहे. या कामाच्या संदर्भात अधिक माहितीची आवश्यकता असल्यास न्यासाचे प्र. व्यवस्थापक श्री. पी. टी. सांडीम तसेच पर्यवेक्षक श्री. संजीव रा. पवार यांच्याशी संपर्क साधावा.

**अटी व शर्ती** :—

१) प्रत्येक निविदाकाराने फक्त १ दरपत्रक सादर करावे.

२) निविदाकाराने VAT/CST क्रमांक दरपत्रकात नमूद करावा.

३) निविदाकाराने VAT/CST क्रमांक लागू नसल्यास, तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे व दरपत्रके सादर करतांना पॅन कार्डाची दुय्यम प्रत सोबत जोडावी.

४) दरपत्रकात कामाचे स्वरूप, ते पूर्ण करण्यास लागणारा कालावधी व मूल्य स्पष्टपणे नमूद करावे.

५) सिलबंद लखोटयावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा.

६) मंदिराच्या बाहेरील परिसरातील संपुर्ण रांगव्यवस्थेवर निगराणी ठेवण्याकरीता भाडेतत्त्वावर ३० आय. आर. एच. डी. कॅमेरे लावणे. सदर कॅमेऱ्याचे मॉनिटरींग करण्याकरीता आवश्यक यंत्रणा बसविणे तसेच मॉनिटरींग करण्याकरीता चार पाळयामध्ये तंत्रज्ञ नेमणे.

७) सदर सीसीटिव्ही यंत्रणा ही सोमवार दि. १२.०६.२०१७ ते मंगळवार दि. १३.०६.२०१७ या दोन दिवसांकरीता भाडेतत्त्वावर न्यासास पूरवावी लागेल. तसेच सदर यंत्रणा कार्यान्वित करून देण्याकरीता व मॉनिटरींगकरीता सोबत तंत्रज्ञ पुरविणे आवश्यक आहे.

८) दरपत्रके सिलबंद लखोटयात बुधवार, दि. २४/०५/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील नोंदणी शाखेत सादर करावीत.

९) बुधवार, दि. २४/०५/२०१७ रोजी दुपारी १.३० वाजता तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील.

( रवि जाधव )
उप कार्यकारी अधिकारी